संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# हे यश म्हणजे तितकेच मोठे आव्हान

**एखादी** गोष्ट किती सातत्याने करावी लागते. आणि त्यासाठी जोखीम आणि जबाबदारीही उचलावी लागते. याचे ताजे उदाहरण म्हणून जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा म्होरक्या मसूद अझरचे देता येईल. अखेर ज्याला आंतरराष्ट्रीय दहशतवादी घोषित करण्याचे काम संयुक्त राष्ट्रसंघाने केले. भारताचे दीडशे प्रवासी असलेल्या विमानाचे अपहरण पंधरा वर्षापूर्वीच झाले. यातले सगळे भारतीय प्रवासी सुखरूपपणे परत यावेत परंतु त्यासाठी मसूद अझरसकट अटक केलेल्या चार अतिरेक्यांची सुटका करण्याची मागणी अपहरणकर्त्यांनी केली होती. त्यावेळी भारताला ती मान्य करावी लागली. म्हणजे २००० सालापासून मसूद अझरची अटक सुटका त्यानंतर त्याने भारतात घडवलेले वेगवेगळे बाँबस्फोट आणि आताही उरी पठाणकोट किंवा पुलवामाच्या हल्ल्यांची त्याच्याच संघटनेने घेतलेली जबाबदारी हा सगळा घटनाक्रम पाहिला तर गेली दहा पंधरा वर्षे मसूद अझर हे नाव प्रत्येक दहशतवादी कृत्यांशी जोडले गेल्याचे दिसून येते आणि अशा या दहशतवाद्याला आंतरराष्ट्रीय दहशतवादी म्हणून घोषित करावे अशी मागणी भारताने लावून धरली. गेली चार वर्षे या मागणीचा सातत्याने पाठपुरावा केला गेला. आता भारताची ही मागणी मान्य झाली म्हणजे भारताला फार मोठा विजय मिळाला असे समजायचे कारण नाही. ही केवळ आंतरराष्ट्रीय स्तरावरची भारताने पार पाडलेली मुत्सद्देगिरी आहे. उलट आता संयुक्त राष्ट्रसंघाने आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांच्या यादीत मसूदचे नाव समाविष्ट केल्यामुळे भारताची जबाबदारी वाढली आहे. कारण ही मागणी मान्य होणे याचा अर्थ भारतात दहशतवादी कारवाया होणार नाहीत. यासाठी तितकीच मोठी खबरदारी आणि जोखीम भारताला घ्यावी लागेल. कारण आता मसूद अझर किंवा त्याच्याच संघटनेवर भारताला तितकेच कसून लक्ष द्यावे लागेल. अन्यथा एवढा पाठपुरावा करून जर भारतातल्या दहशतवादी कारवाया चालूच राहिल्या तर हा सगळा खटाटोप व्यर्थ ठरू शकतो. याशिवाय ज्या चीनने मसूद अझरला आंतरराष्ट्रीय दहशतवादी घोषित करण्यास विरोध केला होता त्या चीनलादेखील भारताविरुध्द बोलण्याची पुन्हा संधी उपलब्ध होऊ शकते. म्हणूनच मसूद अझरबाबत मिळालेले हे यश भारताची जबाबदारी वाढवणारे आहे हे याचवेळी लक्षात घ्यायला हवे.

### चीनला चपराक

हीं गोष्ट खरी आहे की पाकिस्तानने मसूद अझर नावाचा राक्षस आपल्या देशात जोपासलेला आहे. पुलवामा हल्ल्यानंतर जैश-ए-मोहम्मद आणि मसूद अझरविरोधात पाकिस्तान काहीतरी ठोस कारवाई करेल अशी अपेक्षा होती. परंतु यापैकी काहीच झाले नाही. उलट आमच्या देशात दहशतवादी नाहीतच इथपासून ते पाकिस्तानचा दहशवादाला विरोध आहे अशी उलटी बोंब मारण्यापर्यंत पाकिस्तानने अनेक उद्योग केले. अखेरीस भारताला पाकिस्तानच्या हद्दीत घुसून हवाई हल्ला करावा लागला. आणि जैश-ए-मोहम्मदचीच ठिकाणे नेस्तनाबूत करण्याची मोहीम पार पाडावी लागली. अत्यंत जाहीरपणाने पुलवामा हल्ल्याची जबाबदारी घेण्याचा उद्दामपणा या जैश ए मोहम्मदच्या म्होरक्याने दाखवला होता. संपूर्ण जग दहशतवादाच्या विरोधात एकत्र येत असताना पाकिस्तान जर अशा विषारी पिलावळीला जोपासण्याचे काम करीत असेल तर कोणताही मानवतावादी देश त्याचे समर्थन करू शकत नाही. संयुक्त राष्ट्र संघामध्ये भारताने ज्या ज्यावेळी हा विषय मांडला त्या त्यावेळी चीन वगळता सगळ्या सदस्यांनी भारताच्या मागणीला पाठिंबा दिला होता. केवळ काही ना काही तांत्रिक मुद्दे काढून चीनने आपले पाकिस्तान प्रेम दाखवण्याचा प्रयत्न केला परंतु सगळा देश, सगळे जग एकीकडे आणि चीन एकीकडे असे चित्र जेव्हा संयुक्त राष्ट्र संघाच्या बैठकीत निर्माण झाले त्यावेळी चीन जाणीवपूर्वक आडमुठेपणा करतो आहे. हे स्पष्टपणे दिसून आले. अमेरिकेसकट फ्रान्स, जपान, इंग्लंड अशा अनेक मोठ्या राष्ट्रांनी चीनचा याबद्दल निषेधही केला एवढेच नव्हे तर चीनने आपल्या भूमिकेत बदल केला नाही तर अन्य सदस्यांना वेगळा विचार करावा लागेल असा इशाराही या प्रमुख राष्ट्रांनी देऊन टाकला होता. दरम्यानच्या काळात भारताने आपले परराष्ट्र सचिव विजय गोखले यांना चीनमध्ये पाठवून या देशाची गैरसमजूत दूर करण्याचा प्रयत्न चालवला. गोखले यांची शिष्टाई यशस्वी झाली. असा देखील त्यातून अर्थ निघतो.

### आता कायम सदस्यत्वासाठी प्रयत्न हवा

यावरून भारताने जे आटोकाट प्रयत्न चालवले होते त्याला यश तर मिळाले आहे. आता हे यश सांभाळण्याची जोखीम भारताला पार पाडायची आहे. कारण दहशतवादाच्या विरोधात भारत जगाच्या बरोबर आहे. किंवा जगही भारताबरोबर आहे असे चित्र निर्माण झाल्यानंतर ते टिकवण्याची फार मोठी जबाबदारी भारतावर येऊन पडते. त्या दृष्टीकोनातून भारताला आपल्या देशामध्ये दहशतवादी विरोधी मोहीमा अधिक तीव्र कराव्या लागतील. जर तसे केले नाही आणि दहशतवादी घटना जर घडत गेल्या तर भारत इतक्या मोठ्या यशाला पात्र ठरला नाही असे म्हणण्याची वेळ येईल. हा एक भाग सांगत असतानाच भारताला मिळालेल्या या यशाची पुढची संधी साधली गेली पाहिजे. कारण मसूद अझरबाबत अन्य सदस्य जर भारताबरोबर असतील तर आता संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेत कायम सदस्य मिळवण्याकरीता भारताने त्याचा उपयोग करून घ्यायला हवा. हे कायम सदस्यत्व जर मिळाले तर भारताला स्वतःच्या सुरक्षिततेची आणखीनच मोठी हमी मिळू शकेल. पाकिस्तानच्या भूमीवर पोसला जाणारा दहशतवाद कायमचा निपटण्यासाठी भारत सुरक्षा परिषदेच्या व्यासपीठाचा आणखी प्रभावी उपयोग करू शकेल. म्हणूनच भारताला मिळालेले यश हा केवळ विजय मानून चालणार नाही तर त्याचे पुढच्या मोठ्या संधीमध्ये रुपांतर करता आले पाहिजे.